स.फौ.के. नं. ८१/२०१९

नि. क्र. ५३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०८ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**माझे नाव – रतन भरत घडशी,**

**वय –** २४ **वर्षे, व्यवसाय** – नोकरी, **राहणार –** निवळी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–**

०१. दिनांक २८/१२/२०१८ रोजी मी कसबा हायस्कुल येथे कॉलेजला जाण्यासाठी सकाळी ०६:३० वाजता निघुन निवळी बस स्टॉप येथे थांबलो होतो. त्यावेळी निवळी, संगमेश्वर ही बस तेथे आली. सदर बसचा क्र. एमएच–१४–बीटी–२४३२ असा होता. सदर बसमध्ये त्यावेळी माझ्यासोबत आणखी काही कॉलेजची मुले व संगमेश्वर येथे दुध विक्रीसाठी आलेल्या मावशी होत्या.

०२. निवळी मधुन संमेश्वरकडे जाताना कापाचीवाडी येथे घाट आहे. तेथे सदर बसमधील चालकाने गाडी वेगात चालवुन त्यांचा बसवरील ताबा सुटल्याने ती रस्त्याच्या उजव्या बाजुला दरीमध्ये कोसळली. सदरची दरी साधारण १०० ते १५० फूट खोल होती. अपघातामुळे माझ्या दोन्ही हातांना व पाठीमागे दुखापत झाली होती. तसेच सह महिला प्रवासी झोरे यांना डोक्याला व उजव्या डोळयाच्या जवळ मार लागला होता, त्या बेशुध्द पडल्या होत्या. सदर बसमधुन एकुण २० ते २५ लोक प्रवास करीत होते. तसेच सह प्रवासी प्रतिक्षा वनगे यांना हाताला दुखापत झाली होती. साक्री झोरे यांना डोक्याला दुखापत झाली होती. स्मिता कुवळेकर यांना कपाळाला व दोन्ही पायांना दुखापत झाली होती.

०३. कापाचीवाडी येथील स्थानीक लोकांनी आम्हाला सदर बसमधुन बाहेर काढले. त्यांनी रुग्णवाहीकेतुन व रिक्षांमधुन आम्हाला संगमेश्वर येथील सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले. संध्याकाळपर्यंत सदर रुग्णालयात आमच्यावर औषधोपचार करण्यात आले. माझ्या हाताला फ्रॅक्चर व कंबरेला मुका मार लागलेला असल्याने मला पुन्हा औषधोपचारासाठी बोलावले होते. त्यामुळे मी दोन ते तीन वेळा पुन्हा हॉस्पीटलमध्ये गेलो होतो. सदर बसच्या

चालकाला दाखविल्यास मी ओळखु शकणार नाही, कारण, घटनेस ०७ ते ०८ वर्षे झाली आहेत. पोलीसांनी माझ्याकडे त्यानंतर चौकशी केली होती.

**सरतपास पुर्ण.**

<u>**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांचेकडून**</u> **–**

**०४.** माझे इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. मी सावर्डे, चिपळुन येथे दुकानामध्ये कामाला आहे. घटनेवेळी मी इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर बसमधील २० ते २५ सह प्रवासी हे माझ्या व्यक्तीगत ओळखीचे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशीनंतर मी दवाखान्यात दोन ते तीन वेळेस औषधोपचारासाठी गेल्याची बाब दाखविणारा कोणताही पुरावा मी तपासीक अधिकारी यांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला पाठीला दुखापत झाल्याची बाब दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी तपासीक अधिकारी यांना दिला नाही. कोणत्या डॉक्टरांचे मी वैद्यकीय प्रमाणपत्र दिले होते, हे मला आता आठवत नाही.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, निवळी–संगमेश्वर या रस्त्यावरुन मी नेहमी प्रवास करतो. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझ्यासोबत आलेले साक्षीदार नामे – प्रतिक्षा वनगे व अपर्णा वनगे या माझ्या सोबत कॉलेजमध्ये शिकण्यासाठी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनास्थळीच्या रस्त्याच्या एका बाजुला डोंगर व एका बाजुला दरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ठिकाणी कोकणातील लोक सकाळच्या वेळेस गुरे चरविण्यासाठी सोडतात. हे म्हणणे खरे आहे की, निवळी कडुन संगमेश्वरकडे जाताना डोंगर रस्त्याच्या डाव्या बाजुला व दरी रस्त्याच्या उजव्या बाजुला होती. मी त्यावेळी बसमध्ये शेवटच्या सीटवर बसलो होतो. मी दुचाकी व चारचाकी चालवितो. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाचा स्पीडोमीटर पाहिल्यानंतरच वाहनाचा वेग आपल्याला कळतो. हे म्हणणे खरे आहे की, घाट भाग असल्यास चढ–उतारामुळे वाहनाचा वेग त्या भागात कमी असतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा घटनास्थळीचा रस्ता हा १० फूट रुंदीचा होता.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, सदरची बस पलटी झालेच्या बाजुला कोणतीही संरक्षक भिंत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या रस्त्याच्या उजव्या बाजुला साईड पट्टीवर मातीचा भुसभुशीत भाग होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनास्थळीच्या आधी ५० मीटर अंतरावर कापाचीवाडी थांबा होता. हे म्हणणे खरे आहे की, कोणतीही एस.टी थांबाच्या पुढे किंवा अलीकडे कमी वेगात असते. हे म्हणणे खरे नाही की, सदर एस.टी ही कापाचीवाडी या थांब्याजवळ थांबली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा भाग हा वळणाचा व संगमेश्वरकडे जाताना उताराचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर उताराआधी तेथे चढाचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, कापाची वाडी थांब्यावर एस.टी थांबली होती व तेथे चार प्रवासी चढले होते.

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, मी एस.टी मध्ये शेवटी बसलो असल्याने त्या एस.टीचा वेग किती होता, हे मला कळले नाही. हे मला माहिती नाही की, सदर एस.टीचे ब्रेक निकामी झाले होते. सदर अपघात कशामुळे झाला, याविषयी मी पोलीसांकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातामध्ये चालकाची कोणतीही चुकी नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळीच्या डाव्या बाजुला डोंगराच्या ठिकाणी गुरे चरत होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याला मोठया साईडपट्टया नाहीत. हे मला माहिती नाही की, ब्रेक निकामी झाल्यामुळे अपघात झाला होता, अगर कसे. साक्षीदार सांगतो की, तसे असु शकेल. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.11 18:31:41 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ११/०९/२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of evidence | :- | 11/09/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 11/09/2025 |
| evidence uploaded on | :- | 11/09/2025 |